Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon • कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवशी संलग्न

**Government College of Engineering, Jalgaon**

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव**

An Autonomous Institute of Government of Maharashtra • महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था

NAAC Accredited with grade B++ (2024-2029) • नॅक द्वारा नामांकन B++ (२०२४-२०२९)

NH53, Jalgaon, Maharashtra, PIN 425 002 INDIA • राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगांव, महाराष्ट्र, पिन ४२५ ००२ भारत

+91-257-2281522 • principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in, principal@gcoej.ac.in

Vision: Globally Accepted Engineers with Human Skills • Website: https://www.gcoej.ac.in • DTE Code: 5004

---

जा.क्र.शाअमज/अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह/२०२५/1227 दिनांक - 17 JUN 2025

# अल्पसंख्यांक मुलींचे वसतीगृह प्रवेश सुचना २०२५ - २६

सर्व विदयार्थीनींना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय जळगाव येथील अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. प्रवेशाबाबतची नियमावली विस्तृत माहिती, अटी व ऑनलाईन अर्ज भरण्याची माहीती www.gcoej.ac.in या वेबसाईटवर देण्यात आली आहे व सुचना फलकावर उपलब्ध आहे.इच्छुकांनी व पात्र विदयार्थिनींनी महाविदयालयाच्या संकेत स्थळावरून माहिती दिनांक १९/०६/२०२५ पासुन अपलोड करावी व अपलोड केलेल्या माहितीची (ऑनलाईन भरलेल्या अर्जाची) प्रिंट घेऊन त्यास आवश्यक ते मुळ कागदपत्र जोडुन संस्थेच्या अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह कार्यालयात २९/०६/२०२५ रोजी सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत जमा करावी. उशीरा आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची संबधितांनी नोंद घ्यावी.

अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह कार्यालयाच्या बाहेरील सुचना फलकावर कोणकोणती कागदपत्रे कोणत्या क्रमाने जोडावयची याची माहिती दिलेली असेल. त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे क्रमाने अर्जासोबत जोडुन त्यानंतरच अर्ज कार्यालयात जमा करावा. जमा झालेल्या सर्व अर्जाची त्यांच्या कागदपत्रासह तपासणी (Verification) केली जाईल व पात्र विदयार्थीनींची वसतिगृह प्रवेशाची यादी जाहीर केली जाईल.

ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक :- https://forms.gle/NeYwu36SHhx8bP9J6

१७/०६/२०२५

डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे

प्राचार्य

शासकिय अभियांत्रिकी महाविदयालय

जळगाव.

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon • कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवशी संलग्न

**Government College of Engineering, Jalgaon**

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव**

An Autonomous Institute of Government of Maharashtra • महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था

NAAC Accredited with grade B++ (2024-2029) • नॅक द्वारा नामांकन ब++ (२०२४-२०२९)

NH53, Jalgaon, Maharashtra, PIN 425 002 INDIA • राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगांव, महाराष्ट्र, पिन ४२५ ००२ भारत

+91-257-2281522 • principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in, principal@gcoej.ac.in

Vision: Globally Accepted Engineers with Human Skills • Website: https://www.gcoej.ac.in • DTE Code: 5004

## अल्पसंख्यांक मुलींचे वसतीगृह प्रवेशाबाबत नियमावली

१.महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दि. २०/१२/२०११ व शासन निर्णय वसगृ-२०१२/प्र.क्र.१६८/का.८, दि.२१/०६/२०१३ व दि. ०५/०९/२०१४ च्या तरतुदीप्रमाणे ७०% जागा अल्पसंख्याक समाजातील पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षण घेणा-या मुलींसाठी राखीव असतील तर उर्वरित ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजीतील पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षण घेणा-या मुलींमधून शासनाच्या प्रचलित आरक्षणानुसार भरण्यात येतील. अल्पसंख्याक समाजातील मुलींचे अर्ज पुरेशा प्रमाणात प्राप्त झाले नसल्यास इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देता येईल.

२.शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना प्रवेशास प्रथम प्राधान्य देण्यात येईल तदनंतर जागा शिल्लक राहील्यास जळगाव शहरातील इतर महाविदयालयातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना प्रवेशासंबंधी कार्यवाही करण्यात येईल.

३.खालील प्रमाणे जागेचे वाटप करण्यात येईल.
७०% जागा अल्पसंख्याक समाजासाठी तर ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजीतील मुलींसाठी शासनातील प्रचलीत आरक्षणानुसार

| ७० % जागांचे वाटप | ३० % जागांचे वाटप |
|---|---|
| मुस्लीम - ३५<br>बौध्द - २१<br>ख्रिश्चन - ०६<br>जैन - ०६<br>शिख - ०१<br>पारशी -०१ | अनुसुचित जाती १३% - ०४ जागा<br>अनुसुचित जमाती ७% - ०२ जागा<br>VJ / NT ११% - ०३ जागा<br>विशेष मागास प्रवर्ग २% - ०१ जागा<br>इतर मागास प्रवर्ग १९% - ०६ जागा<br>सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग १०% - ०३ जागा<br>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक १०% - ०३ जागा<br>अराखीव २८% - ०८ जागा |

४.अल्पसंख्याक समाजातील मुलींचे अर्ज पुरेशा प्रमाणात प्राप्त झाले नसल्यास इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देण्यात येईल. त्यासाठी इच्छुक मुलींकडुन अर्ज घेण्यात येईल. प्रवेशासाठी गुणानुसार व शासनाच्या प्रचलीत आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाबाबतचा निर्णय संबंधित संस्थेचे प्राचार्य व त्यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत घेण्यात येईल. पात्र विदयार्थीनी प्रवेशापासुन वंचित राहणार नाहीत याची दक्षता समिती मार्फत घेण्यात येईल.

५.शुल्क आकारणी : वसतीगृहात प्रवेश घेणा-या मुलींसाठी प्रत्येक वर्षासाठी सर्वसाधारणपणे ५७००/- शुल्क आकारणी करण्यात येईल.

६.अल्पसंख्याक समाजातील कुंटुबाचे वार्षिक उत्पन्न रू. ८,००,०००/- पेक्षा कमी आहे अशा मुलींसाठी शुल्क पुर्णपणे माफ असेल व अश्या विदयार्थीनीना प्रवेशाकरीता प्राधान्य देण्यात येईल.

७.इतर कुठल्याही कारणास्तव जर संबंधित विदयार्थीनीने प्रवेश रदद केला असल्यास प्रतिक्षा यादीतील विदयार्थीनीला गुणवत्तेप्रमाणे व शासनाच्या प्रचलीत आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येईल.

८.जेवन नाश्ता इ. चा खर्च वसतीगृहात वास्तव्य करणा-या विदयार्थीनीना स्वत: भागवावा लागेल.

९.प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :-

i) जन्म दाखला
ii) वार्षिक उत्पन्नाचा दाखला मागील तीन वर्षाचा
iii) HSC व मागील शैक्षणिक वर्षाची गुणपत्रिका
iv) जातीचा दाखला
v) अल्पसंख्याक समाज असल्याचे सक्षम अधिका-याकडुन प्राप्त दाखला
vi) सध्या शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र
vii) सध्या शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेचे ओळखपत्र

१७/०६/२०२५

डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय
जळगांव